IJFANS INTERNATIONAL JOURNAL OF FOOD AND NUTRITIONAL SCIENCES
ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

# कृषी क्रांतीचे जनक : महात्मा ज्योतिबा फुले

प्रा. डॉ. अरविंद युगंधर
मराठी विभाग प्रमुख
व्ही. एम. व्ही. कॉलेज,
वर्धमान नगर नागपूर.
भ्रमणध्वनी : 9850732874

## सारांश :

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारताची ओळख कृषीप्रधान देश अशी असली तरी वर्तमान परिस्थितीमध्ये आपल्या देशाच्या कृषीची व्यवस्था अत्यंत दयनीय आहे जागतिकीकरणाचा प्रभाव आज सर्वत्र वाढलेला असून या जागतिकीकरणाच्या चक्रात भारतीय शेतकरी सापडला आहे आणि त्यामुळे त्याची अवस्था अत्यंत दयनीय , दिवसेंदिवस कष्टमय आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल होत आहे या लेखाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा एक अल्पसा प्रयत्न करीत आहे . आज देशातील दुष्काळग्रस्थ शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट असून अनुदानासाठी सरकारवर अवलंबून राहणारा तसेच कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येस प्रवृत्त होणारा शेतकरी आज आपल्या डोळ्यासमोर साकार होताना दिसतो. 19 व्या शतकामध्ये इंग्रजी राजवटीत जी परिस्थिती शेतकऱ्यांची होती तीच परिस्थिती सरकारी आजही आपल्याला पहावयास मिळते . शासकीय ध्येय - धोरणे आणि साधनातील झालेल्या बदलांमुळे , व्यापारी प्रवृत्तीमुळे तत्कालीन परिस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले यांनी इंग्रज सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर भट-ब्राम्हणशाहीवर, नोकर वर्गावर तसेच सावकार वर्गावर आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने आसूड ओढण्याचा प्रयत्न केला तसेच शेतकरी वर्गाच्या दैनंदिन स्थितीला वरील घटक कसे जबाबदार आहेत ते त्यांनी अनेक उदाहरणाच्या माध्यमातून पटवून दिले आहे. वर्तमान काळामध्ये शेतकऱ्यांच्या वाढत्या

आत्महत्येला जबाबदार असलेले सरकारी धोरण, बदललेल्या हवामानाचा शेतकरी वर्गावर होणारा परिणाम, नापिकीमुळे वाढत चाललेला कर्जबाजारीपणा, सावकारशाही यासारख्या अनेक कारणांमुळे शेतकरी समाजाचे जीवन हलाकीचे झाले असून बदलत्या वातावरणामुळे देखील कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ यामुळे जगाचा पोशिंदा शेतकरी हा या दुष्टचक्रात सापडलेला आहे आणि त्यामुळे त्याला कोणताही या संकटामधून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नसल्यामुळे तो आत्महत्येस प्रवृत्त होतो आहे आणि ही गंभीर समस्या दिवसेंदिवस वाढत आहे .दीडशे वर्षांपूर्वी महात्मा ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन शेतकऱ्यांची दैनंदिन परिस्थिती लक्षात घेऊन 'शेतकऱ्यांचा आसूड ' या नावाचा 1883 साली एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला या संशोधन लेखामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कालोचित शेती विषयक विचारांचा मागवा घेण्याच्या उद्देशाने आणि वर्तमान परिस्थितीशी त्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये केलेला आहे.

## प्रास्ताविक :

भारतीय शेतकऱ्यांची अवस्था बदलविण्यात महात्मा ज्योतिराव फुले यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे . भारताच्या इतिहासातील ते पहिले समाजसुधारक म्हणून त्यांचा आवर्जून उल्लेख करता येईल . ज्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी केवळ विचारच मांडले नाही तर शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी तत्कालीन इंग्रज राजवटी समोर त्यांनी अनेक निवेदने देऊन शेतकऱ्यांची बाजू देखील मांडली

इंग्रजी राजवटीमध्ये शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा तत्कालीन सावकार, नोकरदार वर्ग, भट , पंडे - पुरोहित कशा पद्धतीने घेत आणि शेतकऱ्यांना कशा पद्धतीने त्यांची फसवणूक करीत त्याचा लेखाजोखा ज्योतिराव फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसुड ' या 1883 मध्ये लिहिलेल्या वरील ग्रंथामध्ये विस्ताराने मांडलेला आहे. भटजी - ब्राह्मण हे

IJFANS INTERNATIONAL JOURNAL OF FOOD AND NUTRITIONAL SCIENCES
ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

शेतकऱ्यांच्या स्त्रियांच्या गर्भधारण संस्कारापासून तर त्यांच्या मृत्यूपर्यंत कशा प्रकारे शोषण करतात तसेच समाजातील दुसरा घटक नोकरशहा हा समाजातील भट - ब्राह्मणांना कसे सहकार्य करतो तसेच शेती व्यवसायासाठी जेव्हा शेतकरी सावकारांकडून कर्ज घेतात, तेव्हा सावकार वर्ग शेतकऱ्यांची कशी फसवणूक करतात यासंबंधीचा आलेख महात्मा फुले यांनी वरील ग्रंथांमध्ये विस्ताराने मांडलेला आहे

## अभ्यास विषयाचे महत्त्व

एकोणिसाव्या शतकामध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दैयनिय अवस्थेची समस्या समजून घेऊन ज्या उपायोजना सुचविल्या त्या आजही शेतकरी वर्गासाठी कशा हितावहआहेत आणि त्या अनुषंगाने समाज जीवनामध्ये जनजागृती होणे कसे गरजेचे आहे या हेतूने सदर विषयाची निवड केलेली आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे

ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन परिस्थितीत शेती सुधारणे विषयी जग उपाय योजना सांगितले त्या पुढील प्रमाणे -

१) व्हाईसरायला शेती सुधारणे संबंधी दिलेला निर्देश
२) पोलीस व लष्कर यांना शेती व्यवसायाशी जोडणे
३) शेती संरक्षणासंबंधी उपाय योजना
४) इंग्रज सरकारच्या कार्यशैलीवर टीका
५) महात्मा फुले यांचा विज्ञान निष्ठा दृष्टिकोन
६) महात्मा फुले यांचा सुधारणावादी दृष्टिकोन
७) निष्कर्ष

### १) व्हॉइस राहिला शेती सुधारणे संबंधी दिलेल्या निर्देश

इंग्रजी राजवटीमध्ये आपल्या देशामध्ये जेव्हा सातत्याने शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू झाली होती ती शेतकऱ्यांची दयनीय अवस्था लक्षात घेऊन महात्मा फुले यांनी तत्कालीन इंग्रजी राजवटीतील व्हाईसरायला शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीसंबंधी अत्यंत समर्पक आणि वास्तववादी वर्णन करणारे निवेदन इंग्रज सरकारच्या व्हाईसरॉयला देऊन शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करावी असा त्यांनी मनोदय व्यक्त केला होता .

**२) पोलिस आणि लष्कर यांना शेती व्यवसायाशी जोडणे**

शेती सुधारणा विषयक विचार व्यक्त करताना महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात “सरकारचे पोलीस खात्यातील शिपाई तसेच लष्कर इत्यादींची मदत घेऊन सर्व डोंगर टेकड्यांच्या पायथ्याशी द-या- खो-याच्या आसपास तलाव तळी निर्माण करायला पाहिजे . या पद्धतीचा उपयोग जर केला तर उन्हाळ्यात देखील शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई भासणार नाही आणि धरणाच्या पाण्यातून बागायती शेती निर्माण होऊन शेतकऱ्यासहित सावकारांच्या आणि शासनाच्या महसुलात, उत्पन्नात देखील वाढ होईल त्याचप्रमाणे सरकारने खेड्याच्या विकासाकरिता प्रत्येक गावात विहिरी खोदून, बांधून दाखविणाऱ्या शूद्र शेतकऱ्यास लहान-मोठी बक्षीस जाहीर केल्यास भारतीय शेतकरी अधिक संपन्न होऊन पाण्याचा प्रश्न मिटल्याशिवाय राहणार नाही”१ असे महात्मा फुले यांना वाटते या विचारातून फुलेंची शेतकऱ्यांविषयीची आपुलकी, जिव्हाळा, प्रेम भावना व्यक्त होताना दिसते. त्याचप्रमाणे सरकारने सर्व नदी नाल्यातील व तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यास कोणताही मोबदला न घेता येऊ द्यावा, यातून जमिनीची प्रतवारी उंचावेल व त्यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याशिवाय राहणार नाही“२ अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, 

**३) शेती संरक्षणाविषयी उपायोजना**

शेतीच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून तत्कालीन इंग्रज सरकारला महात्मा फुले यांनी नियोजनबद्ध नियमांचा माध्यमातून इंग्रज सरकारला अभ्यास पूर्ण माहिती दिली असून भारतीय शेतकऱ्यांचे उज्वल भविष्य महात्मा फुले यांनी वर्तविले आहे. इंग्रज सरकारने जंगलातील रानटी जनावरापासून शूद्र शेतकऱ्यांच्या शेतीचा बचाव करण्याकरिता गावठी बंधुका शेतकऱ्यांचे हाती सोपवायास पाहिजे असेच सरकारने असे केले नाही तर किमान सरकारने ते काम आपल्या पोलीस खात्याकडे सोपवायला पाहिजे शेतकऱ्यांच्या शेतीचे उत्पन्न रानडुकरे सातत्याने उद्ध्वस्त करीत असतात अशावेळी वरिष्ठ पोलिसांनी शेतकऱ्यांच्या शेतीची निगा राखण्यासाठी अंमलदरांची नेमणूक करावी आणि जर का नेमणूक केल्यानंतर देखील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान जर झाले तर हा पोलीस शिपयाच्या पगारातून कपात करून घेऊन ते शेतकऱ्यांना द्यावे तसेच शेतकऱ्यांच्या विद्वान मुलांना पदवी प्रदान करून सरकारने त्यांना स्वखर्चाने परदेशातील प्रगत तंत्रज्ञान पाहण्याकरिता पाठवावे यामुळे भारतीय शेतकरी ताबडतोब आपल्या मुलांच्या माध्यमातून आपल्या शेतीमध्ये सुधारणा घडवून आणून जीवन जगायला प्रवृत होईल"३ असा आशावाद महात्मा फुलेंनी व्यक्त केला आहे.

**४) इंग्रज सरकारच्या कार्यशैलीवर टीका**

भारतीय शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन महात्मा फुले असे म्हणतात की भारतीय शेतकरी शेतामध्ये कष्ट करून सरकारास कराच्या माध्यमातून जमीन महसूल जकातीद्वारे कोट्यावधी रुपयांनी देत आहे तथापि या मोबदल्यात शूद्र शेतकऱ्यांच्या मुलास शेतीसंबंधी ग्रंथ अथवा नेटिव वर्तमानपत्रातील शेतीसंबंधीची प्रगत माहिती जागतिक घडामोडी इत्यादी विषयाचे ज्ञान इंग्रज सरकार देत नाहीत त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांपैकी लक्षावदी कुटुंबास एक वेळचे पोटभर जेवण, वस्त्रे, निवारा सुद्धा

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

पुरविण्यास सरकार तयार नाहीत.स्वतः संरक्षणासंबंधी काळजी घेण्याकरिता लष्कर पोलीस इत्यादी खात्यातील नोकरदाराकरिता मोठ्या प्रमाणात पगार वाढ करून तसेच गोऱ्या सरकारी कामगारांनाही हजार रुपये दरमहा पगार देऊन पैशाचा सातत्याने अपवाय करीत आहे तीस-पस्तीस वर्षे सरकारची चाकरी केली की त्यांना दरवर्षी शेकडो रुपयांचे पेन्शन देता येते दुसरीकडे शेतकऱ्यांना हलाखीचे जीवन कंठावे लागत आहे"४

सरकारच्या या कार्यप्रणालीवर महात्मा ज्योतिबा फुले यांनी कडाडून टीका केली.

**५) महात्मा फुले यांचा विज्ञानवादी दृष्टीकोन**

महात्मा फुले इंग्रज सरकारला निवेदना मधून असे सांगू इच्छितात की इंग्रज सरकारने भारतीय शेतकरी युरोपियन शेतकऱ्यांप्रमाणे विद्यादान तंत्रज्ञान तसेच इतर सोयी सुविधा निर्माण करून द्याव्या, ज्यामुळे भारतीय शेतकरी आपल्या परंपरागत शेतीत सुधारणा करू शकेल त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील सर्व लोकांनी गाय, बैलाची हत्या न करण्यासंबंधी सरकारने कठोर कायदा करावा आणि ज्यांना गाय-बैलाचे मांस भक्षण करायचे आहे त्यांनी इतर मुलखा मधून ते मास मागवावे परंतु शेतीसाठी उपयोगी असणाऱ्या गाई -बैलाची हत्या करू नये . तसेच सरकारने शेतीसाठी योग्य बैलाचा पुरवठा करावा आणि शेतीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असे महात्मा फुले यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

**६) महात्मा फुले यांचा सुधारणावादी दृष्टिकोन**

महात्मा फुले यांनी तत्कालीन व्हाईसरॉयल निवेदन देताना असे म्हटले होते की " सरकारने गावालगतची गावरान जमिनी जुडपी - जंगल शेतकऱ्यास परत केल्यास भारतीय शेतकरी स्वावलंबी होईल, इमारती लाकडे तोडणे विषयी सक्तीचा कायदा करून जुलमी फॉरेस्ट खात्याची होळी केल्यास शेतकऱ्यांना त्यापासून फायदा होईल, सरकारने उत्तम शेळी - मेंढीची खरेदी करून त्याचा पुरवठा शेतकऱ्यास करावा त्यातून उत्तम खतांची

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

निर्मिती होऊन जमीन सुपीक बनेल शेती उत्पन्नात वाढ होईल परिणामी शूद्र शेतकऱ्यास त्याचा फायदा होईल", असे महात्मा फुले यांना मनापासून वाटते.

## ७) निष्कर्ष

१) महात्मा फुले यांना समाजातील अंधश्रद्धा व कर्मकांडे मान्य नसल्यामुळे त्यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेवर कडाडून हल्ला केला.

२) शेतकऱ्यांना शिक्षण नसल्यामुळे त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन भडजी ब्राह्मण त्यांना फसवतात त्यामुळे महात्मा फुले यांनी शिक्षणावर अधिक भर दिला.

३) शेतकऱ्याच्या दैनी अवस्थेत तो स्वतः काही प्रमाणात जबाबदार असल्यामुळे त्यांनी बहुपत्नीत्व आणि बालविवाह यासारख्या व प्रथावर टीका केली.

४) शेतकऱ्यांनी परंपरागत शेती न करता आधुनिक शेतीची कामे करावी शेतीपयोगी जोडधंदा करावा असे मत महात्मा फुलेंनी व्यक्त केले.

५) समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी सरकारने जातीच्या संख्येनुसार नोकऱ्यांमध्ये भरणा करावा.

६) शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या भटजी ब्राह्मण नोकरशाही आणि सावकारशाही यांच्यावर कठोर कारवाई करावी असे विचार त्यांनी आपल्या निवेदनात व्यक्त केले

७) शेतकऱ्यांमध्ये नीतिमत्ता असावी त्या संदर्भात त्यांच्या नैतिक विकासासाठी कठोर कायदे करावे यासंदर्भात त्यांनी विचार व्यक्त केले.

८) शेतीचा युरोपियन पद्धतीने विकास व्हावा यासंदर्भात कायदे करण्याचा सल्ला महात्मा फुले यांनी इंग्रज सरकारला दिला.

९) महात्मा फुले यांनी ग्रामीण समाज व्यवस्थेच्या मुळाशी जाऊन त्याची सामाजिक आर्थिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक चिकित्सा केलेली आहे.

१०) निकृष्ट झालेल्या शेतीच्या सुधारणे विषयी निरनिराळे उपाय ज्योतिराव फुले यांनी सांगितले आहे.

**उपसंहार:**

आज जागतिक स्तरावर ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड प्रगती झालेली आहे या प्रगतीचा फायदा अनेक मोठमोठे देशांनी शेतीच्या सुधारणेमध्ये केलेला आहे आपल्या देशातील मोठमोठ्या जमीनदारांनी देखील या सुधारणा ची अंमलबजावणी केलेली आहे परंतु जो पारंपरिक पद्धतीने शेती करणार जो शेतकरी आहे , अल्पभूधारक आहे तो आजही जुन्याच पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि पारंपरिक पद्धतीचे कष्टमय जीवन जगत आहे. 1991 साली भारताने जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरण या नवीन आर्थिक धोरणाची मुहूर्तमेढ रोवली आणि इथूनच शेतकऱ्यांच्या जीवनाची अधोगती सुरू झाली अशा सेज च्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार वाढविला आणि हळूहळू शेतकरी शेतीपासून दूर जाऊन स्वतःची उपजीविका चालविण्यासाठी नाना प्रकारचे व्यवसाय करू लागला. म्हणूनच महात्मा फुले यांना त्याकाळी असे वाटत होते की शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये सुधारणा घडविण्यासाठी सरकारने नवीन धोरणाची अंमलबजावणी करावी. आज वर्तमान काळामध्ये शेतकऱ्याच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी पूर्वीच्या सरकारने जे आयोग बसविलेले होते त्या आयोगाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये बदल घडवावा. आज शेतकरी वर्गाचा विचार केला असता असे लक्षात येते की ज्योतिराव फुले यांच्या काळची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यामध्ये फारसे अंतर नाही फक्त काळाचे अंतर वाढले असले तरी जगण्याचा आधार शोधण्यासाठी ग्रामीण भागातील लोंढेच्या लोंढे शहराकडे स्थलांतर करताना दिसत आहे. ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहे, आज ज्या आधुनिकतेच्या गप्पा

आपण करतो तो विचार महात्मा फुलेंनी दीडशे वर्षांपूर्वीच मांडला होता. ज्ञानावर आधारित शिक्षणासोबतच कौशल्यपूर्ण मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले यांनी पूर्वीच केले होते त्यासाठी त्यांनी आपल्या शाळेत शेती व औद्योगिक शिक्षण सक्तीचे केले होते.

काळ झपाट्याने बदलत गेला असला तरी काही प्रश्न समाजात पूर्वी इतकेच किंवा अधिक प्रमाणात तीव्र होत गेले. शेतकऱ्यांच्या निकृष्ट परिस्थितीचे वास्तवदर्शी चित्र महात्मा फुले यांनी अतिशय संयमाने रेखाटले शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे, छोट्या शेतकऱ्यांचे प्रश्न स्वातंत्र्याच्या काळात तसेच कायम होते खेड्यापाड्यात पसरलेला लहान शेतकरी कंगल आणि कर्जबाजारी होत गेला. याला कारण फुलांची शेतकऱ्यांना चा अशिक्षितपणा असल्याचे प्रामुख्याने सांगितले. या संदर्भात आपल्या काव्यमय शैलीत विद्येचे महत्त्व प्रतिपादन करताना ज्योतिराव फुले म्हणतात ,

“विद्ये विना मती गेली|
मतीविना नीती गेली|
नितीविना गती गेली|
गतीविना वित्त गेले|
वित्ता विना शूद्र खचले|
इतके सारे अनर्थ |
एका अविद्येने केले|”

शूद्र शेतकरी इतका दिन अवस्थेत येऊन पोहोचण्यासाठी धर्म व सरकारचे धोरण हे प्रामुख्याने कारणीभूत होते. ब्राह्मणाचे सामाजिक वर्चस्व त्याची धर्मसत्ता सावकारी पाश अशा तिहेरी जातात सामान्य जन - कष्टकरी आणि शेतकरी सापडलेला होता हेच शेतकऱ्यांचे अधोगतीचे मुख्य कारण ओळखून महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची

मुख्य कारणे अर्थव्यवस्थेत आणि अन्याय समाधी व्यवस्थेत कशी सामावलेली आहे याचे सर्वांगीण चिंतन त्यांनी मार्मिकपणे मांडलेले आहे.

वर्तमान परिस्थितीमध्ये जमीनदार आणि सावकार यांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका केल्याशिवाय शेतकऱ्यांची आर्थिक बाजू सक्षम होणार नाही . अत्यंत परखडपणे ज्योतिराव फुले यांनी सांगितले महात्मा फुले यांना आर्थिक जीवन हे सामाजिक समता व न्यायावर आधारित हवे होते त्याकरिता त्यांनी शेतीची आधुनिकीकरण झाले पाहिजे त्याचबरोबर शेतकरी व श्रमजीवी लोकांना दारिद्र्यातून मुक्त करणे त्यांना आवश्यक वाटत होते, महात्मा फुले यांचा आर्थिक विचार हा सामाजिक विषमतेतून जन्माला आला असला तरी आर्थिक विकासाशिवाय कोणत्याही समाज रचनेचा उत्कर्ष होऊ शकत नाही . वंचित व मागासलेल्या घटकांचा सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय स्तर वाढवायचा असेल तर सामाजिक समानता महत्त्वाची मानून प्रत्येकाच्या कामाला योग्य मोबदला शेतकऱ्यांच्या कर्जाचे ओले कमी करणे शेतकऱ्यांना आवश्यक तेवढी जमीन कसण्यासाठी उपलब्ध करून देणे आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याकरिता कायदा तयार करणे याशिवाय शेतकऱ्यांची उन्नती होणे शक्य नाही, असे चिंतन त्यांनी तत्कालीन शेतकऱ्यांची अवस्था पाहून आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड ' या ग्रंथातून मार्मिकपणे प्रकट केले आहे अशाप्रकारे वर्तमान परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाची गरज आजही आमच्यासाठी प्रेरणादायी आहे.

## संदर्भ ग्रंथ :

१) धनंजय कीर , स. गं. मालशे- संपा. २००६, महात्मा फुले समग्र वांग्मय पृ. १८९ , २१, ४.

२) गं. बा. सरदार - 'महात्मा फुले व्यक्ती आणि विचार' मुंबई १९८१, पृ. १७८, १८५. १८६

३) धनंजय कीर - स .गं मालशे -संपा. २००६, महात्मा फुले समग्र वांग्मय पृ. २६२, २६३.



IJFANS
International Journal of Food And Nutritional Sciences

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 11, Iss 12, 2022

४) डॉ. वासुदेव मुलाटे 'ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा' स्वरूप प्रकाशन,प्रथम आवृत्ती २००५